आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२८ जून २०२४ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- शेतकरी, महिला, युवा, अल्पसंख्याकांसाठी विविध सवलती जाहीर करणारा राज्याचा चालू आर्थिक वर्षाचा अतिरीक्त अर्थसंकल्प विधिमंडळात सादर

- पुढच्या महिन्यापासून राज्यातल्या अडीच कोटींहून अधिक महिलांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून दरमहा मिळणार दीड हजार रुपये

- मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेतून १० लाख युवकांना वर्षभर मिळणार दहा हजार रुपयांपर्यंत विद्यावेतन, साडे ७ अश्वशक्ती क्षमतेपर्यंतच्या शेतीपंपांना पूर्णत: मोफत वीज

- अवकाळी पावसामुळे शेतीचं नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना १५ जुलैपर्यंत मदत देण्याचं राज्य सरकारचं विधानसभेत आश्वासन

**आणि**

- महिला क्रिकेटमध्ये, दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या कसोटी सामन्यात पहिल्या दिवशी भारताच्या विक्रमी ५२५ धावा / स्मृती मंधाना आणि शेफाली वर्मा यांची भागीदारी, जलद शतक आणि द्विशतकाचे विक्रम

**<><><><><>**

शेतकरी, महिला, युवा, अल्पसंख्याकांसाठी विविध सवलती जाहीर करणारा राज्याचा चालू आर्थिक वर्षाचा अतिरीक्त अर्थसंकल्प उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत सादर केला. हा त्यांचा दहावा अर्थसंकल्प आहे. विधानपरिषदेत मंत्री दीपक केसरकर यांनी हा अर्थसंकल्प सादर केला.

पेट्रोल आणि डिझेलवरचा मूल्यवर्धित कर राज्यभरात एकसमान करण्याची घोषणा अर्थमंत्र्यांनी आज केली. त्यानुसार मुंबई, ठाणे आणि नवी मुंबई महापालिका

क्षेत्रात डिझेलवरचा व्हॅट सध्याच्या २४ टक्क्यांवरुन २१ टक्के प्रस्तावित केला आहे. यामुळं डिझेल लीटरमागे २ रुपये ७ पैशांनी स्वस्त होईल. तर पेट्रोलवरचा व्हॅट २६ टक्क्यांवरुन कमी करुन २५ टक्के करणे प्रस्तावित आहे. यामुळं पेट्रोल लिटरमागे ६५ पैसे स्वस्त होईल.

एकूण ६ लाख १२ हजार २९३ कोटी रुपयांची तरतूद अजित पवार यांनी या अर्थसंकल्पात केली आहे. महसुली खर्च ५ लाख १९ हजार ५१4 कोटी रुपये अंदाजित करण्यात आला आहे. तर २० हजार ५१ कोटी रुपयांची महसुली तूट आणि १ लाख १० हजार ३५५ कोटी रुपयांची राजकोषीय तूट आहे.

**<><><><>**

बहुचर्चित, “मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण” योजनेची घोषणा आजच्या अर्थसंकल्पात अर्थमंत्र्यांनी केली. या अंतर्गत २१ ते ६० वर्ष वयोगटातल्या पात्र महिलांना दरमहा दीड हजार रुपये आर्थिक मदत दिली जाणार आहे. यासाठी एकूण ४६ हजार कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केली आहे. राज्यातल्या अडीच कोटींहून अधिक महिलांना याचा लाभ होण्याची शक्यता आहे. प्रत्येक घरामागे ३ गॅस सिलिंडर मोफत देणाऱ्या मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेचीही घोषणा अजित पवार यांनी आज केली. ५२ लाखांहून अधिक कुटुंबांना याचा लाभ होईल.

चालू शैक्षणिक वर्षापासून अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र, वैद्यकीय तसेच कृषिविषयक सर्व व्यावसायिक पदवी-पदविका अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या मुलींना शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्काची १०० टक्के प्रतिपूर्ती देण्याचा निर्णयही सरकारनं जाहीर केला. ८ लाख रुपयांपर्यंत वार्षिक कौटुंबिक उत्पन्न असणाऱ्या इतर मागासवर्ग तसेच, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतल्या २ लाखांहून अधिक मुलींना या निर्णयाचा लाभ होण्याचा अंदाज आहे.

**<><><><>**

युवकांना प्रत्यक्ष कामाचं प्रशिक्षण मिळावं, यासाठी ‘मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजने’ची घोषणा या अर्थसंकल्पात झाली. याअंतर्गत दहा लाख युवकांना वर्षभर कामाचं प्रशिक्षण दिलं जाईल आणि त्यासाठी दरमहा दहा हजार रुपयांपर्यंत विद्यावेतन राज्य सरकार देईल. शासनाच्या योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी दरवर्षी ५० हजार युवकांना कार्यप्रशिक्षण सरकार देणार आहे.

**<><><><>**

शेतकऱ्यांना मोफत वीज देण्यासाठी सरकारनं मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजनेची घोषणा अर्थसंकल्पात केली. यात ४४ लाखांहून अधिक शेतकऱ्यांच्या साडे ७ अश्वशक्ती क्षमतेपर्यंतच्या शेतीपंपांना पूर्णत: मोफत वीज पुरवली जाईल. याशिवाय मागेल त्याला सौरउर्जा पंप देण्याची योजनाही सरकारनं जाहीर केली. नुकसानीचे पंचनामे जलद आणि पारदर्शी होण्यासाठी ई-पंचनामा प्रणाली संपूर्ण राज्यात लागू होणार आहे.

गाव तेथं गोदाम योजनेची घोषणा सरकारनं केली असून यात पहिल्या टप्प्यात १०० नवीन गोदामांचे बांधकाम आणि दुरुस्ती केली जाईल.

अटल बांबू समृद्धी योजनेतून १० हजार हेक्टर खाजगी क्षेत्रावर बांबूची लागवड करण्याचा मानस सरकारनं जाहीर केला आहे. यात प्रतिरोपासाठी १७५ रूपये अनुदान दिलं जाणार आहे.

**<><><><>**

सर्व स्वरुपातलं सार्वत्रिक दारिद्र्य नाहीसं करण्याचं शाश्वत विकास ध्येय साध्य करण्याचा मानस राज्य सरकारनं जाहीर केला आहे. संजय गांधी निराधार अनुदान योजना आणि श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेतून आता दरमहा एक हजार ऐवजी दीड हजार रुपये अर्थसहाय्य दिलं जाईल. दिव्यांग व्यक्तींसाठी

‘धर्मवीर आनंद दिघे घरकुल योजना’ सरकारनं जाहीर केली आहे. त्यात पहिल्या टप्प्यात ३४ हजार ४०० घरं बांधली जाणार आहे.

**<><><><><>**

वारकऱ्यांसाठी ‘मुख्यमंत्री वारकरी संप्रदाय महामंडळ’ स्थापन करण्याची घोषणा अर्थमंत्री अजित पवार यांनी आजच्या अर्थसंकल्पात केली. यातून किर्तनकार, वारकरी, भजनीमंडळ यांना सोयी सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातील. तसंच पालखी मार्गांचं व्यवस्थापन केलं जाईल, असं ते म्हणाले. पंढरपूर वारीला जागतिक नामांकन मिळावं यासाठी युनेस्कोकडे प्रस्ताव पाठवणार असल्याची घोषणा त्यांनी केली. याशिवाय कोकणातली कातळशिल्पे, दहीहंडी उत्सव आणि गणेशोत्सवाचाही प्रस्ताव पाठवला जाईल. यावर्षीपासून वारीतल्या मुख्य पालख्यांतल्या दिंड्यांना प्रतिदिंडी २० हजार रुपयांचे अर्थसाह्य सरकार देणार आहे.

**<><><><><>**

राज्याचा अतिरिक्त अर्थसंकल्प हा सर्वसामान्यांचा अर्थसंकल्प असून महिला आणि बेरोजगारांना आर्थिक ताकद देण्याचं सरकारचं उद्दिष्ट असल्याची प्रतिक्रिया मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली.

**होल्ड - मुख्यमंत्री बाइट**

केंद्राकडून राज्यांना मिळणाऱ्या कर हिश्श्यात वाढ होण्याची अपेक्षा असून अर्थसंकल्पात पर्यायांचा विचार केल्याचं अजित पवार यांनी यावेळी सांगितलं.

अतिशय प्रगतिशील, सर्वजन हिताय, सर्वजन सुखाय असा अर्थसंकल्प असल्याची प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी व्यक्त केली.

शेतकऱ्यांना मोफत वीज देण्याचा क्रांतीकारक निर्णय घेत बळीराजाच्या कष्टाचा आदर आणि सन्मान या अर्थसंकल्पात केल्याचं मत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार **सुनील तटकरे** यांनी व्यक्त केलं.

तर, फसव्या योजनांची ठिगळं लावलेला खोकेसंकल्प अशी टीका विधानसभेतले विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली. सरकारनं निवडणुका डोळ्यासमोर ठेवून अर्थसंकल्पाच्या नावाखाली महायुतीचा निवडणूक जाहीरनामाच सादर केला आहे, असा आरोप त्यांनी केला.

हा अर्थसंकल्प आश्वासनांची अतिवृष्टी आणि थापांचा महापूर असून त्यात शेतकऱ्यांना कर्जमाफी न देता त्यांची लूट करण्यात आली आहे, अशी प्रतिक्रिया माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केली.

दिशाभूल करणारा अर्थसंकल्प अशा शब्दात काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष **नाना पटोले** यांनी टीका केली आहे. मोघम अर्थसंकल्प असून त्यात विभागनिहाय तरतुदी नसल्याचं मत त्यांनी व्यक्त केलं.

अतिशय बेजबाबदार अर्थसंकल्प असून पेट्रोल डिझेलचे दर कमी करण्याचा नुसता आव आणि फक्त घोषणा असलेला पोकळ अर्थसंकल्प असल्याचं राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी म्हटलं आहे.

**<><><><>**

अवकाळी पावसामुळे शेतीचं नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना १५ जुलैपर्यंत मदत देऊ, असं आश्वासन सरकारनं आज विधानसभेत दिलं. अवकाळी पावसामुळे राज्यातल्या दोन लाख ९१ हजार हेक्टरहून अधिक शेतीचं नुकसान झाल्याची माहिती मदत आणि पुनर्वसन मंत्री अनिल पाटील यांनी दिली.

**<><><><>**

महिला क्रिकेटमध्ये, भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात आज चेन्नईत सुरु झालेल्या कसोटी सामन्यात भारतानं, पहिल्यांदाच, एका दिवसात ५०० पेक्षा जास्त धावा करण्याचा विक्रम नोंदवला. भारताची कर्णधार हरमनप्रीत कौर हिनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. स्मृती मंधानानं शतक, तर

शेफाली वर्मानं द्विशतक झळकावलं. या दोघींनी पहिल्या गड्यासाठी २९२ धावांची भागिदारी केली. हाही एक विक्रम आहे. स्मृतीनं १४९, तर शेफालीनं २०५ धावा केल्या. शेफाली सर्वात जलद शतक करणारी महिला फलंदाज ठरली. तिनं ११३ चेंडूत शतक साकारलं. याआधी इंग्लंडच्या जॅन ब्रिटिननं १९८४ मधे ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या सामन्यात १३७ चेंडूत शतक झळकावलं होतं. तिचा हा विक्रम स्मृती मंधानानं १२२ चेंडूत शतक ठोकत मोडला. तिच्यापेक्षा कमी चेंडूत शतक पूर्ण करत शेफालीनं नवा विक्रम नोंदवला. त्यानंतर १९४ चेंडूत द्विशतक करत तिनं आणखी एक विक्रम नोंदवला.

आजचा खेळ थांबला तेव्हा भारताच्या ४ बाद ५२४ धावा झाल्या होत्या. जेमिमा रोड्रिग्सनं ५५ धावा केल्या. कर्णधार हरमनप्रीत कौर ४२, तर रिचा घोष ४३ धावांवर खेळत होत्या.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात कोकण आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी तर मराठवाड्यात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

**//<><><><><>//**